**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः 02.10.2023** **वारः सोमवार**

---

**ठळक बातम्या**

- राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना कार्यांजली वाहण्यासाठी आयोजित स्वच्छता मोहिमेला देशभरात प्रचंड प्रतिसाद
- एक तारीख, एक तास एक साथ मोहिमेत राज्यातील 16 लाखांहून अधिक नागरिकांचा सहभाग
- राज्यातील 350 गड किल्ल्यांवर स्वच्छता मोहिमेचा प्रारंभ
- नाशिक जिल्ह्यात कांदा लिलाव अजूनही बंदच आणि
- आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंची पदकांची लयलूट सुरूच; स्टीपलचेस प्रकारात अविनाश साबळेची सुवर्ण कामगिरी.

---

**स्वच्छता मोहिम**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना कार्यांजली वाहण्यासाठी सर्वांनी एक तारीख एक तास एक साथ हे स्वच्छता अभियान राबवावं असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं होतं. या आवाहनाला देशभरात काल उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. देशभरात राबवण्यात आलेल्या या सर्वात मोठ्या स्वच्छता मोहिमेमध्ये स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही सहभाग घेतला. कुस्तीपटू अंकित बैयनपुरिया समवेत ते स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले. विविध केंद्रीय मंत्री, सेना दलांमधील जवान, विविध क्षेत्रातील मान्यवर आणि सामान्य नागरिकांनी या स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला.

स्वच्छता हीच सेवा अभियानाअंतर्गत काल राज्यातही 'एक तारीख, एक तास' एक साथ स्वच्छता अभियान राबवण्यात आलं. सकाळी 10 ते 11 या कालावधीत राज्यातील सर्व 411 स्थानिक स्वराज्य संस्थांमधील 14 हजार 522 ठिकाणी श्रमदानातून स्वच्छता करण्यात आली. यात मान्यवरांसह 16 लाख 4 हजार 995 नागरिकांनी सहभाग घेत सुमारे 1 हजार 942 टन

कचरा जमा केला. नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. के. एच. गोविंदराज यांनी ही माहिती दिली. राज्यभरातल्या या मोहिमेविषयी अधिक माहिती घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत काल राज्यभरात एक तारीख एक तास एक साथ हे स्वच्छता अभियान राबवण्यात आलं. मुंबईत गिरगाव चौपाटीवर राज्यपाल रमेश बैस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः श्रमदान करत या मोहिमेत भाग घेतला. सुंदर महाराष्ट्र, सुंदर भारत घडवण्याच्या दिशेने टाकलेलं हे मोठे पाऊल असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. मुंबईचे पालकमंत्री दीपक केसरकर, ज्येष्ठ क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर, इस्त्रायलचे कौन्सिल जनरल कोबी, यांच्यासह चित्रपट सृष्टीतील मान्यवरांनीही या स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाच्या 350 व्या वर्षानिमित्त राज्यात गड-किल्ल्यांची स्वच्छता करण्यात येणार आहे या मोहीमेचा प्रारंभ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल शिवडी किल्ल्यावर झाला. स्वच्छतेची लोकचळवळ आता सुरू झाली आहे असं सांगून ते म्हणाले की जिल्हा वार्षिक योजनेतून दरवर्षी गड किल्ल्यांसाठी तीन टक्के निधी उपलब्ध करून दिला जाईल. राज्यातील 418 शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थातील दीड लाख विद्यार्थी ही गड किल्ल्यांची स्वच्छता मोहीम राबवणार आहेत. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, यावेळी उपस्थित होते.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती शहरात विविध भागांमध्ये नागरिक, शालेय विद्यार्थ्यांसोबत स्वच्छता मोहिमेत सक्रीय सहभाग घेतला. पुण्यातही पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुणे महापालिकेच्या वतीने आयोजित महामोहीमेत सहभाग घेतला. यावेळी पाटील यांच्याबरोबरच अनेक विद्यार्थी आणि नागरिकांनी महापालिका परिसर, शनिवार वाडा, भिडे पूल आदी ठिकाणी स्वच्छता केली. केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणेही जुहू चौपाटीवरच्या स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले होते. नंदुरबार जिल्ह्यात राज्याचे आदिवासी विकास मंत्री आणि पालकमंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी अंधारे चौकातील स्वच्छता अभियानात  प्रत्यक्ष घेतला. नाशिक मध्ये दिंडोरी तालुक्यातल्या रामशेज किल्ला आशेवाडी इथं आयोजित अभियानात केंद्रीय राज्यमंत्री भारती पवार यांनी सहभाग घेतला. जालना जिल्ह्यात केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या हस्ते मोती तलाव परिसरात स्वच्छता अभियान राबवण्यात आले. धुळ्यात आरोग्य विभागाच्या वतीनं स्वच्छता अभियानाचे आयोजन केलं होतं. त्यामध्ये विविध आरोग्य केंद्र, उपकेंद्र या ठिकाणी कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी स्वच्छता मोहीम राबवली. केंद्र सरकारच्या माहिती प्रसारण मंत्रालयाच्या क्षेत्रिय प्रचार कार्यालयाच्या वतीनं अहमदनगर जिल्ह्यातल्या नेवासा इथल्या त्रिमुर्ती शैक्षणिक संकुलच्या विद्यार्थ्यांनी श्रमदान करत दत्तसागर तलावाची स्वच्छता

केली. तर धाराशिव जिल्ह्यातल्या तुळजापूर तालुक्यातल्या नळदुर्ग किल्ला परिसरात स्वच्छता अभियान राबवण्यात आलं. राज्यभरातली सर्व विद्यापीठे, सरकारी संस्था, स्वयंसेवी संस्था, संघटना यांच्या वतीने आपापल्या परिसरात स्वच्छता मोहिम राबवली. केंद्रीय नेत्यांपासून सामान्य नागरिकांपर्यंत सर्वांनी एक तारीख एक तास, एक साथ या स्वच्छता मोहिमेला उस्फूर्त प्रतिसाद देत ही मोहिम यशस्वी केल्याचं चित्र पहायला मिळालं. आकाशवाणी बातम्यांसाठी आमच्या ठिकठिकाणच्या वार्ताहरांसह विजयालक्ष्मी साळवी, पुणे.

## गांधी जयंती

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची आज 154 वी जयंती आहे. माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांचीही आज जयंती आहे. यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. महात्मा गांधींच्या सत्य आणि अहिंसेच्या आदर्शांनी जगाला एक नवीन मार्ग दाखवला, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात....**

## कांदा लिलाव

उपमुख्यमंत्री अजित पवार आणि केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी केलेल्या मध्यस्थी नंतरही नाशिक जिल्ह्यातील कांदा व्यापारी, “लिलाव बंद” आंदोलनावर ठाम आहेत. केंद्र सरकारने वाढवलेलं 40 टक्के निर्यात शुल्क कमी करावं, नाबार्ड आणि एनसीसीएफने खरेदी केलेला कांदा देशांतर्गत बाजारपेठेत विकू नये यासह विविध मागण्यांसाठी कांदा व्यापाऱ्यांनी हे आंदोलन सुरू केलं आहे. हे आंदोलन मागे घ्यावं यासाठी शासकीय स्तरावर बैठकाही झाल्या आहेत. शनिवारी संध्याकाळी नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंत इथं नाशिक जिल्हा कांदा व्यापारी संघटनेची बैठक झाली; त्यात, जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत  तोपर्यंत लिलाव बंद कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

## राष्ट्रीय शिक्षण धोरण

राष्ट्रीय शिक्षण धोरणाची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून पुढच्या वर्षी जूनमध्ये सर्व महाविद्यालयांनी या धोरणानुसार अभ्यासक्रम राबवणं बंधनकारक आहे, असं उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी म्हटलं आहे. पुण्यातील जे. पी. नाईक शिक्षण

आणि विकास केंद्रात आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन सत्रात ते काल बोलत होते. भारतीय शिक्षण संस्थेनं जेष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्राध्यापक जे. पी. नाईक यांच्या 116 व्या जयंतीनिमित्त या परिषदेचं आयोजन केलं आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण-2020 अंतर्गत उच्चशिक्षणातील सर्व घटकांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या, असा या परिषदेचा विषय आहे. या दोन दिवसांच्या परिषदेमध्ये देशभरातील 300 हून अधिक संशोधक, प्राध्यापक सहभागी झाले आहेत.

**<u>ईद</u>**

हजरत मोहम्मद पैगंबर जयंतीच्या निमित्ताने काल पुण्यात नाना पेठेतील मन्नुशाह मशिद इथून मिरवणूक काढण्यात आली. राजकीय आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी मुस्लिम बांधवांचं स्वागत केलं; तर मुस्लिम बांधवांनी खजूर वाटून नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

**<u>कोकण रेल्वे</u>**

पनवेलजवळ मालगाडी घसरल्यामुळे कोकण रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली असून काल सुटणाऱ्या अनेक गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. तर 20 गाड्या उशिराने धावल्या. यामुळे गणेशोत्सवानंतर मुंबईला निघालेल्या नागरिकांचे हाल झाले. राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांची गैरसौय लक्षात घेत सिंधुदुर्ग, सावंतवाडी, कुडाळ, कणकवली इथून 6 एसटी बस रेल्वे स्थानकातून थेट मुंबईला सोडण्याचा निर्णय घेतला.

**<u>आशियाई</u>**

चीनमधे सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंची पदकांची लयलूट कालही सुरूच होती. काल भारतीय खेळाडूंनी 15 पदकं पटकावली, यात तीन सुवर्णपदकांचा समावेश होता. पुरुषांच्या तीन हजार मीटर स्टीपलचेस प्रकारात अविनाश साबळे यानं नवा विक्रम नोंदवला. आठ मिनिटे आणि 19 पूर्णांक 53 सेकंदांची वेळ नोंदवत त्यानं सुवर्णपदकावर आपलं नाव कोरलं. पुरुषांच्या गोळाफेक प्रकारात तेजींदर पाल तूर यानं सुवर्ण पदकाची कमाई केली. तर महिलांच्या पंधराशे मीटर धावण्याच्या स्पर्धेत हरमीलन बैंस हीनं रौप्यपदक पटकावलं. नेमबाजीत पुरुषांच्या सांघिक ट्रॅप प्रकारात भारतीय खेळाडूंनी सुवर्णपदक पटकावलं. नेमबाजीमध्ये भारतीय खेळाडूंनी देशाला सर्वाधिक म्हणजे 22 पदकं मिळवून दिली आहेत. कालच्या आठव्या दिवस अखेर भारताच्या खात्यात 13 सुवर्ण, 21 रौप्य आणि 19 कास्य

पदकांसह एकंदर 53 पदकं जमा झाली असून पदकतालिकेत भारत सध्या चौथ्या स्थानावर आहे.

**पाऊस**

रत्नागिरी जिल्ह्यात शनिवारी रात्रीपासून सुरू झालेल्या मुसळधार पावसाचा जोर काल संध्याकाळी थोडा कमी झाला; पण पावसाची संततधार सुरूच होती. अतिवृष्टीमुळे रत्नागिरी शहरासह तालुक्यात अनेक ठिकाणी दिवसभर वीजपुरवठा खंडित होता, तो संध्याकाळी पूर्ववत झाला. खेड, संगमेश्वरसह जिल्ह्यात अनेक ठिकाणी सखल भागांत पाणी शिरलं. पुणे आणि परिसरातही काल पावसानं जोरदार हजेरी लावली.

**हवामान**

मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल असा इशारा हवामान विभागानं दिला आहे. उर्वरित ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल.

---

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**